दैनिक सकाळ, सांगली. दि.२६/०६/१५

## मध्य कृष्णा उपखोऱ्याचा एकात्मिक जल आराखडा (अग्रणी उपखोरे)

# लाभधारकांशी सल्लामसलत कार्यशाळा

### महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे -११

## सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली

वारणाली, सांगली

दूरध्वनी क. ०२३३/२३०२७०१, (फॅक्स) २३०२६४३

ई-मेल : sesic_sangli@wrd.maharashtra.gov.in

१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ अन्वये राज्याचा खोरे/उपखोरेनिहाय एकात्मिक जल आराखडा (Integrated State Water Plan) तयार करणे अनिवार्य आहे. कृष्णा खोऱ्याची विभागणी पाच उपखोऱ्यामध्ये करण्यात आली आहे. या प्रत्येक उपखोऱ्याचा प्रारूप जलआराखडा तयार करण्यात आला आहे.

२) उपखोऱ्यातील भूपृष्ठावरील व भूगर्भातील पाण्याचा एकात्मिक जल आराखडा तयार करणे, जलसंपत्ती विकासाचे प्रकल्प निश्चित करणे व त्याचा प्राधान्यक्रम ठरविणे, जलसंधारण तसेच पाण्याच्या गुणवत्तेचे संरक्षण व त्यामध्ये निरंतर सुधारणा करणे ही या जल आराखड्याची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

३) मध्य कृष्णा (K-2, अग्रणी) उपखोऱ्यामध्ये खालील जिल्हा/तालुक्यांचा समावेश होतो.

(१) **सांगली जिल्हा** : खानापूर, तासगाव, मिरज, कवठेमहांकाळ, जत

४) प्रारूप जल आराखडा पुस्तिका व संक्षिप्त माहिती पुस्तिका जलसंपदा विभागाच्या www.wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर, तसेच खालील संपर्क कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध करण्यात आली आहे.

| अ. क्र. | जिल्हा | संपर्क अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व कार्यालयाचा पत्ता | दूरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | सांगली | (१) श्री. जे. के. गलगली, सहा. अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली, वारणाली, सांगली | मो. ९१७५२७३२७७ |
| | | २) श्रीमती सुचिता भिकाने, उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली | ०२३३-२३७३७०७ |

५) मध्य कृष्णा उपखोऱ्याचा (के-२ अग्रणी) एकात्मिक जल आराखडा मसुदा अंतिम करण्यापूर्वी संबंधित लाभार्थी/वापरकर्ते यांची मते आजमावून घेणे व संबंधित घटकांशी सल्लामसलत करणेकरिता (Stake Holder Consultation) कार्यशाळा घेण्याचे प्रस्तावित आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| दिनांक | वेळ | ठिकाण | संपर्क कार्यालय |
|---|---|---|---|
| २६/०७/२०१५ | १०.०० ते २.०० | पंचायत समिती सभागृह, कवठेमहांकाळ | **अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली** |

६) इच्छुक लाभार्थी/वापरकर्त्यांनी उपलब्ध प्रारूप जल आराखड्यासंबंधी आपले मत/अभिप्राय लेखी स्वरूपात कार्यशाळेमध्ये द्यावेत अथवा प्रत्यक्ष, पोस्टाने, ईमेलद्वारे दिनांक २६/०७/२०१५ पर्यंत अधिक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सांगली या कार्यालयाकडे द्यावेत.

७) बैठकीत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी **स्वखर्चाने** येणे अपेक्षित आहे.

**(इंजि. हणमंत गुणाले)** अधीक्षक अभियंता,
सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली